शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यमूल्यमापन
अहवालावर कार्यवाही करणेबाबत संस्करण अधिका-यांची
जबाबदारी निश्चित करणेबाबत.

वाचा संदर्भ :-

१. शासन निर्णय, क्रमांक : सी एफ आर १२१०/ प्र.क्र.४७/२०१०/तेरा /दि.०१.११.२०११
२. शासन निर्णय,क्रमांक: सामान्य प्रशासन विभाग क्र. सीएफआर१२११/प्र.क्र.२५७/तेरा.दि.०२.०२.२०१७
३. शासन निर्णय क्रमांक : सामान्य प्रशासन विभाग क्र. सीएफआर१२११/प्र.क्र.२५७/तेरा.दि.०७.०२.२०१८
४. संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक . स्था /१८/ब/कार्यमूल्यमापन अहवाल २०१७-१८/ल.ले(व)/७६० दि.०५.०४.२०१८

---

क्र.स्था.१८/२०१९/ब/ /ल.ले (व)/ संस्करण अधिकारी / ७२. दिनांक : 05 AUG 2019

संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा,
६ वा मजला,कोकण भवन ,सी बी डी बेलापूर,
नवी मुंबई ४००६१४

## परिपत्रक

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सवंर्गातील "गट-अ" अधिका-यांचे सन २०१६-१७ या कालावधीपासून व "गट-ब" (राजपत्रित ) अधिका-यांचे सन २०१७-१८ या कालावधीपासून कार्यमूल्यमापन अहवाल हे MAHAPAR ( www.mahapar.gov.in ) या संगणक प्रणाली व्दारे online लिहावयाचे शासनाने योजिले आहे. तसेच गट-क कर्मचा-यांनी सन २०१७-१८ कालावधीपासून कार्यमूल्यमापन अहवाल हे संदर्भ क्र. ३ मधील शासन निर्णयामधील सुधारीत नमुन्यात लिहून सादर करावयाचे आहेत.

संचालनालयाच्या परिपत्रक क्र.४ अन्वये संचालनालय व संचालनालयाच्या अधिनस्त विभागीय कार्यालय व त्यांचे अधिनस्त कार्यालयात असलेले म वि व ले से संवर्गातील गट-अ अधिका-यांचे कार्यमूल्यमापन अहवालातील परिशिष्ट -अ मधील तपशिल संचालनालयाने, तर विभागीय कार्यालयाने त्यांच्या कार्यालयातील तसेच अधिनस्त सहाय्यक संचालक कार्यालयातील कार्यरत म वि व ले से संगर्वातील गट-ब अधिका-यांचे परिशिष्ट-अ मधील तपशिल विभागीय कार्यालयाने महापार या संगणक प्रणालीवर online लिहून संबंधित अधिका-याच्या Login ID पाठवावयाचा आहे.

उपरोक्त कार्यमूल्यमापन अहवाल कार्यपध्दतीचे बदलते स्वरुप व कार्यमूल्यमापन अहवालाच्या अनुषंगाने करण्यात येणारे पत्रव्यवहार तसेच कार्यमूल्यमापन अहवालावर आवश्यक ती कार्यवाही करुन ते जतन करणे इ. कामकाजामध्ये सुसूत्रता यावी व सदर काम नियोजित पध्दतीने विहित वेळेत पूर्ण व्हावे, यासाठी संबंधित कामकाजाबाबतची जबाबादारी निश्चित करणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने कार्यमूल्यमापन अहवालावर कार्यवाही करणेसाठी खालील प्रमाणे संस्करण अधिकारी निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | संस्करण अधिकारी |
|---|---|---|
| १ | संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा नवी मुंबई | सहाय्यक संचालक (प्रशासन) |
| २ | विभागीय कार्यालय, कोंकण ,नाशिक ,पुणे, औरंगाबाद, अमरावती व,नागपूर | विभागीय कार्यालयात कार्यरत असलेले सहाय्यक संचालक |

संस्करण अधिका-यांची खालीलप्रमाणे जबाबदारी राहील

१. गट -क कर्मचा-याचे कार्यमूल्यमापन अहवाल हे संदर्भ क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयातील सुधारीत नमुन्यात Offline लिहावयाचे आहेत. त्यामुळे गट-क कर्मचारी यांच्या कार्यमूल्यमापन अहवालाबाबतची कार्यवाही ही संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णयात दिलेल्या तरतूदीनुसार संस्करण अधिका-यानी करावयाची आहे.

२. म वि व ले से संवर्गातील गट-अ व ब अधिका-यांचे कार्यमूल्यमापन अहवाल हे MAHAPAR या संगणक प्रणालीव्दारे Online लिहावयाचे आहेत. त्याअनुषंगाने संचालनालयाने संदर्भ क्र.४ अन्वये निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार कार्यवाही करावी. Online पध्दतीने कार्यमूल्यमापन अहवालावर कार्यवाही करताना संस्करण अधिका-यांने विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त जिल्हा सहाय्यक संचालक स्था नि ले प कार्यालयाशी समन्वय साधून अधिका-यांकडून स्वयमूल्यनिर्धारण विहित वेळेत लिहिण्यासंबंधी पाठपुरावा करुन कार्यमूल्यमापन अहवाल हे MAHAPAR या संगणक प्रणालीमध्ये कोणत्याही स्तरावर प्रलंबित राहणार नाही यांची दक्षता घ्यावयाची आहे.

३. उपरोक्त नमूद केलेले शासन निर्णय तसेच या संबंधाने वेळोवेळी निर्गमित झालेले/ होणारे शासन निर्णय / परिपत्रके यातील सूचनांचे काटेकोर पणे पालन करावयाची जबाबदारी ही संस्करण अधिका-यांची राही याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक संचालनालयाच्या www.mahalfa.maharashtra.gov.in संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

(सुनिल भोसले.)
संचालक
संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा
महाराष्ट्र राज्य.

प्रत : सर्व विभागीय कार्यालय व जिल्हा सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा यांना योग्य त्या कार्यवाही साठी अग्रेषित (E-mail ) व्दारे